# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ २५६५६२३४, E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in, Web : www.ropune.org.in


*कालमर्यादा - ३०/०८/२०१९*

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदोन्नती/२०१९/ 3439 दिनांक : 23 AUG 2019

*परिपत्रक :*

**विषय :- गट क मधील पदे पदोन्नतीने भरणेबाबत..**

या कायार्लयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थामधील **खाली नमूद केलेली पदे " ज्येष्ठता अधिन पात्रता "** विचारात घेऊन पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर पदासाठी वेतनश्रेणी व आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | पदोन्नत पदाचे पदनाम, वेतनश्रेणी व प्रवर्ग संख्या | ज्या संवर्गातून / पदामधून पद भरावयाचे आहे त्याचे पदनाम | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१ | सहाय्यक ग्रंथपाल (वेतन स्तर – एस ७ : २१७०० – ६९१००) (खुला ०१) | गट - क मधील पदे | १) गट क मधील पदावर तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>३) महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त ग्रंथालय संघाचे लायब्ररी सायन्स मधील प्रमाणपत्र.<br>४) ग्रंथालयातील किमान एक वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत. (मागासवर्गीयांसाठी) |
| ०२ | निदेशक (लोहार) (वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००) (खुला ०३) | गट - क / ड मधील पदे | १) सध्याच्या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>३) शासनमान्य आय. टी. आय. मधील लोहार काम किंवा समकक्ष ट्रेड उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक<br>४) पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी शिकविण्याचा / प्रात्यक्षिकाचा पुरेसा व समाधानकारक अनुभव आवश्यक.<br>५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |
| ०३ | निदेशक (कातारी) (वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००) (खुला ०१) | गट - क / ड मधील पदे | १) सध्याच्या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>३) शासनमान्य आय. टी. आय. मधील कातारी ट्रेड उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक<br>४) पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी शिकविण्याचा / प्रात्यक्षिकाचा पुरेसा व समाधानकारक अनुभव आवश्यक.<br>५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |

| अ. क्र. | पदोन्नत पदाचे पदनाम व वेतनश्रेणी | ज्या संवर्गातून / पदामधून पद भरावयाचे आहे त्याचे पदनाम | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|
| | | | |
| ०४ | निदेशक (जोडारी) (वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००) (खुला ०१) | गट - क / ड मधील पदे | १) सध्याच्या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>३) शासनमान्य आय. टी. आय. मधील जोडारी (फिटर) ट्रेड उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक<br>४) पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी शिकविण्याचा / प्रात्यक्षिकाचा पुरेसा व समाधानकारक अनुभव आवश्यक.<br>५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |
| ०५ | निदेशक (सुतार) (वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००) (खुला ०२) | गट - क / ड मधील पदे | १) सध्याच्या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>३) शासनमान्य आय. टी. आय. मधील सुतार ट्रेड उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक<br>४) पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी शिकविण्याचा / प्रात्यक्षिकाचा पुरेसा व समाधानकारक अनुभव आवश्यक.<br>५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |
| ०६ | निदेशक (सांचेकार) (वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००) (खुला ०१) | गट - क / ड मधील पदे | १) सध्याच्या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>३) शासनमान्य आय. टी. आय. मधील साचेकार ट्रेड उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक<br>४) पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी शिकविण्याचा / प्रात्यक्षिकाचा पुरेसा व समाधानकारक अनुभव आवश्यक.<br>५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |
| ०७ | निदेशक (भट्टीचालक) (वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००) (खुला ०१) | गट - क / ड मधील पदे | १) सध्याच्या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) इंग्रजीचे ज्ञान आवश्यक<br>३) Oil fired and electrical furnance चे ज्ञान अवश्यक<br>३) हिट ट्रिटमेंट शॉप किंवा रिफायनरी प्लॅन्ट किंवा फाऊंड्री मधील कामाचा पुरेसा अनुभव आवश्यक<br>४) मशिन ड्रॉईंगचे कामाची माहिती असलेल्या कर्मचा-यास प्राधान्य.<br>५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |
| ०८ | पंप परिचर (वेतन स्तर – एस ६ : १९९०० – ६३२००) (खुला ०१) | गट - ड मधील पदे | १) जल प्रयोगशाळेतील फ्रान्सिस व्हील टर्बाईन, पेल्टर व्हील टर्बाईन, रेसी प्रकेटींग पंप, सेंट्रीफ्युगल पंप, थ्री सिंगल फेज अशा पंपावरील काम येणे आवश्यक.<br>२) कर्मशाळेतील मशिनचे कुलंट पंप मशिनचे दुरुस्तीचे व विद्युत प्रवाह देऊन चाल करण्याचे काम येणे आवश्यक<br>३) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी) |

| अ. क्र. | पदोन्नत पदाचे पदनाम व वेतनश्रेणी | ज्या संवर्गातून / पदामधून पद भरावयाचे आहे त्याचे पदनाम | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|
| ०९ | वाहनचालक (वेतन स्तर – एस ६ : १९९०० – ६३२००) (खुला ०२) | गट - ड मधील पदे | १) गट ड मधील पदावर तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा, अथवा शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>३) मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतुदींनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेला हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक<br>४) शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा तीन वर्षांहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव आवश्यक.<br>५) मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक.<br>६) वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख व चांगली शरिरीक क्षमता असणे आवश्यक.<br>७) संबंधित क्षेत्राची परिपूर्ण भौगोलिक माहिती आवश्यक.<br>८) मराठी, हिंदी भाषा वाचता, बोलता व इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे.<br>९) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत. (मागासवर्गीयांसाठी) |

सबब आपल्या संस्थेतील जे कर्मचारी सदर पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असतील त्यांची माहिती खालील प्रपत्रामध्ये भरुन दिनांक **३०/०८/२०१९ पर्यंत** या कार्यालयास त्यांचे **अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह** सादर करावी.

| अ. क्र. | कर्मचा-याचे संपूर्ण नांव | पदनाम | वेतन श्रेणी (रुपये) | प्रवर्ग व जात | जन्म दिनांक | मूळ नेमणूक दिनांक | शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झाल्याच्या वर्षासह) | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा कसे ? | शेरा / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

कर्मचा-यांचे संस्थेतील उपलब्ध अभिलेख व सेवापुस्तके यामधील नोंदींवरुन, तसेच कर्मचा-यांकडून त्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, दाखले इत्यादी घेऊन तपासावीत व माहिती या कार्यालयास सादर करावी.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२ जून, २०१४ मधील तरतूदींनुसार गट क संवर्गातील प्रत्येक कर्मचा-याने त्याची स्वत:ची मत्ता व दायित्वे याबद्दलची विवरणपत्रे विहीत प्रपत्रांमध्ये भरुन संस्था प्रमुखांकडे सादर करणे आवश्यक असल्याने, ज्या कर्मचा-यांनी उपरोक्त पदांवद पदोन्नतीसाठी अर्ज केले आहेत, अशा कर्मचा-यांनी त्यांचे मत्ता व दायित्वे याबाबतचे विवरणपत्रे विहीत प्रपत्रामध्ये भरुन सादर केली आहेत किंवा कसे ? याबाबत खात्री करुनच अर्ज सादर करावेत.

तसेच आपल्या संस्थेतील / कार्यालयातील सदर पदांसाठी पात्र कर्मचा-याची माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, तसेच पाठविलेल्या माहितीमध्ये कांही त्रुटी आढळल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचा-यांना जबाबदार धरण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी., तसेच सदरचे पत्र आपल्या संस्थेतील / कार्यालयातील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याची पोहोच घ्यावी व पुढील कार्यवाही करावी.

संस्थेमध्ये मधील कर्मचारी उपलब्ध नसल्यास किंवा पदोन्नतीसाठी अर्ज करण्यास इच्छूक नसल्यास **'निरंक'** अहवाल सादर करण्यात यावा.

23/3/2019

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : संचालक / सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड / सर्व शासकीय तंत्रनिकेतने / म. रा. इन्स्टि. ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टैक्नॉलॉजी, पुणे / उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : या कार्यालयातील श्री. सं. बा. शिंदे, प्रोग्रॅमर यांना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याकरिता.